पीएच.डी. संशोधन आराखडा

“उदगीर व चाकूर तालुक्यातील शासकीय आरोग्य केंद्रे व मानवी आजार यांच्या वितरणाचा तुलनात्मक भौगोलिक अभ्यास”

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड

मानव विज्ञान विद्याशाखे अंतर्गत भूगोल विषयातील पीएच.डी.
(विद्यावाचस्पती) या पदवीकरिता सादर केल्या जाणा—या शोधप्रबंधाचा
आराखडा

संशोधक

प्रशांत ज्ञानोबा खटके

(एम.ए.बी.एड्, नेट,सेट)

मार्गदर्शक

डॉ. गणेश लक्ष्मण जाधव

(एम.ए.सेट,पी.एच.डी.)

प्रोफेसर

भूगोल विभाग

संभाजी महाविद्यालय, मुरूड

ता.जि. लातूर

संशोधन केंद्र

महात्मा गांधी महाविद्यालय, अहमदपूर

जि. लातूर

“उदगीर व चाकूर तालुक्यातील शासकीय आरोग्य केंद्रे व मानवी आजार यांच्या वितरणाचा तुलनात्मक भौगोलिक अभ्यास”

1.1 प्रस्तावना :

‘आरोग्यम् धन संपदा’ हे संस्कृत मधील सुभाषित आरोग्याचे महत्त्व स्पष्ट करते. आरोग्य हे धन संपदेपेक्षाही महत्त्वाचे असलेले दिसून येते. जर एखाद्या व्यक्तीकडे उत्तम आरोग्य नसेल तर त्या व्यक्तीच्या जीवनाला काहीच अर्थ उरत नाही. एखाद्या देशाचा विकास हा तेथील लोकसंख्येच्या आरोग्यावर अवलंबून असतो. म्हणून एखाद्या देशाचा विकास पहावयाचा असेल तर तेथील लोकांच्या आरोग्याकडे पहावे लागेल. या मानवाच्या आरोग्यावर विविध घटकांचा परिणाम झालेला पहावयास मिळतो. त्यात प्रामुख्याने भौगोलिक घटक, आर्थिक घटक, सांस्कृतिक घटक महत्त्वाचे असलेले दिसून येतात.

आरोग्य भूगोल ही मानवी भूगोलाची एक शाखा असून यात मानवी आरोग्य आणि मानवाशी संबंधीत रोगाचा अभ्यास केला जातो. पर्यावरणा अंतर्गत असे विविध घटक आहेत की जे मानवी रोगाची उत्पत्ती व विकासात महत्त्व पुर्ण भूमिका पार पाडतात. भौगोलिक वातावरण मानवी जीवनाला प्रत्यक्ष रूपात प्रभावीत व नियंत्रीत करते.

1.2 आरोग्याचा अर्थ आणि व्याख्या :

सुखी जीवनाची गुरूकिल्ली म्हणजे व्यक्तीचे उत्तम आरोग्य होय. आरोग्य म्हणजे मानवी शरीरात कोणत्याही प्रकारच्या आजाराचा अभाव असणे अशी व्याख्या करता येईल. सुदृढ शरीराशिवाय मानव सुखी जीवन जगू शकत नाही. आणि ते आरोग्यदायी असल्याशिवाय शक्य नाही. त्याकरीता शरीर आणि मन दोन्हीही निकोप असावे लागतात.

: आरोग्याच्या व्याखा :

1. जागतीक आरोग्य संघटना : (1946)

‘शरीरात केवळ कोणताही आजार किंवा दुर्बलता नसणे म्हणजे आरोग्य नव्हे तर त्यात संपूर्ण शरिरीक, मानसिक आणि सामाजिक संतुष्टी असण्याची अवस्था म्हणजे आरोग्य होय.’

2. जे.एफ. विलियम्स :

‘आरोग्य जावनाचा गुण असून ज्यामुळे व्यक्तीला अधिक चांगल्या प्रकारे जीवन जगून सर्वोत्तम सेवा देणे होय.’

3. वेबस्टर :

‘आरोग्य म्हणजे शरीर आणि मनाची स्थिती मजबूत असणे म्हणजे मनुष्य हा शारिरीक रोग किंवा व्याधीपासून पुर्णपणे मुक्त असणे होय’.

4. ‘संपूर्ण आरोग्य एक दिशा आहे की, जी आत्मा, शरीर आणि मन यांच्यात समन्वय करून मानवाला चेतना देते’.

5. ‘शरीरात कोणत्याही प्रकारच्या आजाराचा अभाव म्हणजे आरोग्य होय’.

मानवी आजाराच्या व्याख्या :

1. आजार किंवा रोग ही अशी स्थिती आहे जी शरीराच्या किंवा त्याच्या एखाद्या भागाचे योग्य कार्य बिघडवते.
2. शरीराच्या कोणत्याही अवयवाच्या किंवा भागाच्या संरचनेत झालेला बिघाड म्हणजे आजार होय.

1.3 अभ्यास क्षेत्राची ओळख :

उदगीर तालुका

लातूर जिल्हयातील एक ऐतीहासीक तालुका म्हणून उदगीर तालुक्याची ओळख आहे. लातूरच्या पुर्वेस या तालुक्याचे स्थान आहे. उदगीर तालुक्याचा अक्षवृत्तीय विस्तार 18° 16′ उत्तर ते 18° 37′ उत्तर अक्षवृत्ताच्या दरम्यान तर रेखावृत्तीय विस्तार 76° 56′ पुर्व ते 77° 21′ पुर्व रेखावृत्ताच्या दरम्यान आहे. उदगीर तालुक्याच्या उत्तर सिमेवर जळकोट व अहमदपूर तालुके, पुर्वेस बीदर जिल्हा, दक्षिणेस देवणी तालुका, पश्चिमेस शिरूर अनंतपाळ व चाकूर तालुके आहेत. उदगीर तालुक्याचे क्षेत्रफळ 779.22 चौकिमी आहे. 2011 च्या जनगणनेनुसार उदगीर तालुक्याची लोकसंख्या 311066 इतकी होती. उदगीर तालुक्यात लेंडी व तिरू या दोन नदी प्रणाली आहेत. उदगीर तालुक्यात प्राथमिक आरोग्य केंद्र आणि उपकेंद्र यांची संख्या 33 आहे. उदगीर तालुक्यातील गावाची संख्या 97 इतकी आहे.

चाकूर तालुका

चाकूर हा लातूर जिल्हयातील मध्यभागी असलेला एक तालुका आहे. चाकूर तालुक्याचे क्षेत्रफळ 668 चौकिमी असून अक्षवृत्तीय विस्तार 18° 30′ उत्तर ते 18° 35′ उत्तर अक्षवृत्त तसेच रेखावृत्तीय विस्तार 76° 40′ पुर्व रेखावृत्त ते 76° 53′ पुर्व रेखावृत्त आहे. 2011 जनगणनेनुसार चाकूर तालुक्याची लोकसंख्या 178089 इतकी आहे. चाकूर तालुक्यात 83 गावे आहेत. चाकूर तालुक्यात प्राथमिक आरोग्य केंद्र आणि उपकेंद्र यांची संख्या 31 आहे. चाकूर तालुक्याच्या उत्तरेस अहमदपूर तालुका असून दक्षिणेस शिरूर अनंतपाळ तालुका आहे. तर पुर्वेस उदगीर आणि पश्चिमेस रेणापूर, लातूर हे तालुके आहेत. चाकूर तालुक्यात घरणी नदी प्रणाली आणि रोहीणा नदी प्रणाली आहेत.

1.4 संशोधनाचे उदिष्टे :

1. उदगीर व चाकूर तालुक्यातील मानवी आजारावर परिणाम करणा–या प्राकृतिक घटकाचा अभ्यास करणे.
2. उदगीर व चाकूर तालुक्यातील मानवी आजारावर परिणाम करणा–या सामाजिक व आर्थिक घटकाचा अभ्यास करणे.
3. उदगीर व चाकूर तालुक्यातील मंडळानुसार आरोग्य केंद्राचा अभ्यास करणे.
4. आरोग्य विषयक शासकीय सेवा सुविधांचे मानवी जीवनातील महत्त्व जाणून घेणे.
5. उदगीर व चाकूर तालुक्यातील लोकसंख्येच्या प्रमाणात आरोग्य विषयक सेवा सुविधांचे मुल्यमापन करणे.
6. आरोग्यविषयक सुविधांचा तालुक्यातील मानवी जीवनावर झालेल्या परिणामाचा अभ्यास करणे.
7. आभ्यासक्षेत्रातील विविध आजाराचा अभ्यास करणे.
8. आरोग्य विषयक सेवा सुविधांचा अभ्यास करून उपाययोजना सुचविणे.

1.5 संशोधनाची गृहीतके :

1. उदगीर व चाकूर तालुक्यातील भौगोलिक घटक आणि आर्थिक घटक मानवी आरोग्याला प्रभावित करीत असतात.
2. अभ्यास क्षेत्रातील उदगीर व चाकूर तालुक्यामध्ये आरोग्य केंद्राचे वितरण विषम प्रकारचे आहे.
3. उदगीर व चाकूर तालुक्यातील आरोग्य सुविधा लोकसंख्येच्या प्रमाणात नाहीत.

1.6 तथ्य संकलन व संशोधन पध्दती :

प्रस्तुत संशाधनासाठी प्राथमिक व द्वितीय प्रकारच्या तथ्य संकलनाचा आधार घेण्यात येणार आहे. प्राथमिक प्रकारच्या तथ्य संकलनासाठी निरीक्षण, प्रश्नावली, मुलाखतीच्या आधारे माहिती मिळविली जाणार आहे. तर द्वितीय प्रकारच्या तथ्य संकलनासाठी जिल्हयाचे सामाजिक व आर्थिक समालोचन विविध प्रकारची आरोग्यविषयक मासिके, साप्ताहिके, शासकीय प्रकाशने व वर्तमानपत्रे इत्यादीचा आधार घेतला जाणार आहे. प्रस्तुत संशोधनात द्वितीयक तथ्य संकलन कालावधी हा 1991 ते 2021 असा असेल.

सदरील संशोधनात विश्लेषनात्मक, संख्यात्मक व वर्णनात्मक संशोधन पध्दतीचा वापर करण्यात येईल.

1.7 संशोधनाच्या मर्यादा :

उदगीर व चाकूर तालुक्यातील आरोग्य केंद्राचा अभ्यास करत असताना फक्त शासकीय आरोग्य केंद्राची माहिती संकलीत केली जाणार आहे. खाजगी आरोग्य केंद्रांचा अभ्यास केला जाणार नाही. सदरचे संशोधन हे फक्त दोन्ही तालुक्यापुरते असून याचा इतर तालुक्याशी जिल्हयाशी तुलना होऊ शकणार नाही. प्राथमिक माहिती मिळविताना संशोधक यथा शक्तीवर मर्यादा ठेवण्याचा प्रयत्न करेल.

1.8 संदर्भ साहित्याचे अवलोकन :

1. डॉ. एम.पी. मानकरी यांनी "बीदर व धारवाड या दोन जिल्हयातील आरोग्यविषयक सेवाच्या वितरणाचा तुलनात्मक अभ्यास" A Comparative Geographical analysis study of Health care facilities in Beedar and Dharwad District. यांनी

आपल्या संशोधनात मानवी आरोग्यावर परिणाम करणा–या घटकाचा अभ्यास केला आहे..

2. डॉ. विरकपाळे एस.एन. यांनी उस्मानाबाद जिल्हयातील आरोग्य केंद्र व मानवी आजार यांचा भौगोलिक अभ्यास या विषयात संशोधन केले आहे व मानवी आरोग्यावर पर्यावरणातील घटकाचा कसा प्रभाव पडतो याचा शोध घेतला आहे.

3. डॉ. विजय बैसाने यांनी औरंगाबाद जिल्हयातील आरोग्य विषयक सुविधांचा भौगोलिक अभ्यास या विषयावर संशोधन करून औरंगाबाद जिल्हयातील आरोग्यविषयक सेवा सुविधाचा आढावा घेतला आहे.

4. प्रा. डी.व्ही. झिंजुर्डे यांनी बीड जिल्हयातील शासकीय आरोग्य सेवा सुविधा एक भौगोलिक अभ्यास या शोध प्रबंधामध्ये बीड जिल्हसातील आरोग्यविषयक सेवा सुविधाचा आढावा घेतला आहे.

5. माजिद हुसेन यांनी मेडीकल जिओग्रॉफी हा ग्रंथ लिहीला असून या ग्रंथामध्ये वैद्यकिय भूगोलाचा विकास व व्याप्ती आरोग्य, रोगाची संकल्पना, पर्यावरण व मानवी आरोग्य इत्यादीचे विश्लेषन केले आहे.

6. प्रा. देवेंद्र मस्की यांनी आरोग्य भूगोल या पुस्तकात आरोग्य भूगोलाची व्याख्या स्वरूप व्याप्ती तसेच आरोग्य भूगोलाचा विकास आणि आरोग्यावर परिणाम करणारे घटक हे स्पष्ट केले आहेत.

7. डॉ. ज्ञानेश्वर सुर्यवंशी यांनी आपल्या आरोग्य भूगोल शास्त्र या ग्रंथात आरोग्य भूगोलाची व्याख्या स्वरूप व्याप्ती, आरोग्यावर परिणाम करणारे घटक, आरोग्य भूगोलाचा विकास यांचा समावेश केला आहे.

8. प्रा. पी.के. कुलकर्णी यांनी आरोग्य व समाज या ग्रंथामध्ये आरोग्य म्हणजे काय? तसेच मानवी आजाराविषयी सविस्तरपणे माहिति दिली आहे.

प्रकरण मांडणी

प्रकरण पहिले : संशोधन आराखडा

1.1 प्रस्तावना

1.2 आरोग्य संकल्पना

1.3 आरोग्य भूगोलाचा अर्थ

1.4 आरोग्य भूगोलाच्या व्याख्या

1.5 आरोग्य भूगोलाचे स्वरूप

1.6 आरोग्य भूगोलाची व्याप्ती

1.7 आरोग्य भूगोलाच विकास

1.8 आरोग्यावर परिणाम करणारे घटक

1.9 भारतीय वैद्यकशास्त्र

1.10 प्राथमिक आरोग्य केंद्रे

1.11 प्राथमिक आरोग्य उपकेंद्रे

1.12 संशोधनाची उदिष्टे

1.13 संशोधनाची गृहितके

1.14 संशोधन पध्दती

1.15 संशोधनाच्या मर्यादा

1.16 संशोधन साहित्याचे पुनरावलोकन

प्रकरण दुसरे : अभ्यास क्षेत्रातील भौगोलिक, सामाजिक, आर्थिक घटकाचा आढावा

2.1 प्रस्तावना

2.2 अभ्यास क्षेत्राची ऐतिहासिक पार्श्वभूमी

2.3 स्थान व विस्तार

2.4 भूपृष्ठ रचना

2.5 नदी प्रणाली

2.6 हवामान

2.7 मृदा

2.8 वनस्पती

2.9 लोकसंख्या

2.10 वस्ती

2.11 कृषी पिके

2.12 जलसिंचन

2.13 रस्ते वाहतूक

2.14 पर्यटन स्थळे

प्रकरण तिसरे : अभ्यास क्षेत्रातील आरोग्यावर परिणाम करणारे नैसर्गीक व सांस्कृतीक घटक

3.1 नैसर्गीक घटक

3.1.1. हवा

3.1.2. पाणी

3.1.3. मृदा

3.1.4. प्राकृतिक रचना

3.2 सांस्कृतिक घटक

3.2.1. शासकीय धोरण

3.2.2. पिण्याच्या पाण्याची व्यवस्था

3.2.3. सांडपाणी

3.2.4. कचरा विल्हेवाट

3.2.5. नाल्या सफाई

3.2.6. व्यसनाधिनता

3.2.7. शौचालयाचा अभाव

3.2.8. अज्ञान

3.2.9. अंधश्रध्दा

प्रकरण चौथे : शासकीय आरोग्य सेवा सुविधा विषयी शासनाची भूमिका

4.1. भारतातील शासकीय आरोग्य सेवा सुविधा

4.2. महाराष्ट्रातील शासकीय आरोग्य सेवा सुविधा

4.3. लातूर जिल्हयातील शासकीय सेवा सुविधा

4.4. उदगीर तालुक्यातील शासकीय सेवा सुविधा

4.5. चाकूर तालुक्यातील सेवा सुविधा

4.6. शासनाचे निर्णय

4.7. विविध आरोग्य योजनाचा अभ्यास

प्रकरण पाचवे : अभ्यास क्षेत्रातील आरोग्य केंद्राचे वितरण

5.1. प्रस्तावना

5.2. उदगीर तालुक्यातील प्राथमिक आरोग्य केंद्राचे वितरण

5.3. चाकूर तालुक्यातील प्राथमिक आरोग्य केंद्राचे वितरण

5.4. उदगीर तालुक्यातील प्राथमिक आरोग्य उपकेंद्राचे वितरण

5.5. चाकूर तालुक्यातील प्राथमिक आरोग्य उपकेंद्राचे वितरण

प्रकरण सहावे : आरोग्य केंद्रातील विविध सेवा पदाचा आढावा

6.1. प्रस्तावना

6.2. उदगीर व चाकूर तालुक्यातील आरोग्य केंद्रातील पदाचा आकृतीबंध

6.3. उदगीर व चाकूर तालुक्यातील आरोग्य केंद्रातील भरलेल्या कर्मचा–याची पदानुक्रमे सद्यस्थिती

6.4. आरोग्य केंद्रातील एकूण मंजूर पदे भरलेली पदे व रिक्त पदाचा आढावा

प्रकरण सातवे : अभ्यास क्षेत्रातील विविध मानवी आजाराचा आढावा

7.1. प्रस्तावना

7.2. पावसाळ्यात होणारे आजार

7.3. हिवाळ्यात होणारे आजार

7.4. उन्हाळ्यात होणारे आजार

प्रकरण आठवे : निष्कर्ष व उपाययोजना

संदर्भ ग्रंथ

1. प्रा. पी.के. कुलकर्णी (2008) – आरोग्य आणि समाज –डायमंड प्रकाशन, पुणे.
2. डॉ. प्रदीप आगलावे (2008), संशोधन पध्दती व तंत्रे, श्री साईनाथ प्रकाशन, नागपूर.
3. डॉ. श्रीकांत कार्लेकर (2007), भूगोल शास्त्रातील संशोधन पध्दती, डायमंड प्रकाशन, पुणे.
4. डॉ. ज्ञानेश्वर सुर्यवंशी (2016), आरोग्य भूगोल शास्त्र, प्रशांत प्रकाशन, जळगाव.
5. Majid Husen, (1994) medical Geography, Anmol Publication, New Delhi.
6. प्रा. देवेंद्र मस्की (2014) आरोग्य भूगोल, अथर्व प्रकाशन, जळगाव.
7. ए.बी.सवदी (2007), महाराष्ट्र भूगोल, निराली प्रकाशन, पुणे.
8. संपादक कैलास बाविसकर (जून 2022), आरोग्य पत्रिका (मासिक), कल्याणी कॉर्पोरेशन, पुणे.
9. विवके सौताडेकर (2007), लातूर जिल्हा, विद्याभारती प्रकाशन, लातूर.
10. इंटरनेट वेबसाईट.

संशोधक
प्रशांत ज्ञानोबा खटके
(एम.ए.बी.एड्, नेट,सेट)

मार्गदर्शक
डॉ. गणेश लक्ष्मण जाधव
(एम.ए.सेट,पी.एच.डी.)
प्रोफेसर
भूगोल विभाग
संभाजी महाविद्यालय, मुरूड
ता.जि. लातूर